## एमएमएफच्या विश्वास शिंदेचे सुयश

*फिनोलेक्स* इंडस्ट्रिज आणि आरोग्यसेवा, शिक्षण, समाजकल्याण आणि जलसंवर्धन या क्षेत्रात कार्य करणारी कंपनीची भागीदार एमएमएफ संस्था मुकुल माधव फाऊंडेशनच्या विश्वास शिंदे या गरीब कुटुंबातील तरुणाने फिनोलेक्स ऑफ मॅनेजमेंट टेक्नॉलॉजी (एफएएमटी)मधील अभियांत्रिकी परीक्षा उत्तीर्ण केली आहे. या तरुणाला एमएमएफने आर्थिक सहाय्य केले होते. विश्वासने ७.७ सीजीए (क्युम्युलेटिव्ह ग्रेड पॉइंट ॲनालिसीस) गुण मिळवले आहेत. चांदराई, रत्नागिरी येथील अत्यंत गरीब कुटुंबातील सामान्य विद्यार्थी विश्वासने सर्व अडीअडचणींवर मात करत हे सुयश मिळवल्याबद्दल त्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.